

**श्री. नामदेव तात्याभाऊ भामरे (स्मार्ट शेतकरी)**
**मु/पो. पिंगळवाडे, ता. बागलाण जि. नाशिक.**
**मो.नं. ९४२१९९६७९९**

पिंगळवाडे (बागलाण, नाशिक) या छोटयाशा खेडेगावात शेतकरी कुंटुबात जन्मलेल्या व के.के.वाघ कृषी महाविद्यालय, नाशिक येथून कृषी पदवीचे शिक्षण पुर्ण करून सध्या एक स्मार्ट शेतकरी अशी स्वतःची ओळख निर्माण करणा-या नामदेव भामरे यांच्या जीवनाची यशोगाथा ही आजच्या तरूण पिढीसाठी प्रेरणादायी आहे.

नामदेव भामरे यांनी त्यांचे शालेय शिक्षण पिंगळवाडे व ताहाराबाद (नाशिक) येथे पुर्ण केले, नंतर त्यांनी २००८ साली कृषी पदवीच्या शिक्षणासाठी के.के.वाघ कृषी महाविद्यालय (नाशिक) येथे प्रवेश घेतला व २०१२ साली कृषी पदवी शिक्षण पुर्ण केले एवढयावरच न थांबता त्यांनी पुणे येथून 'कृषी व्यवसाय व्यवस्थापन' यात पदव्युत्तर शिक्षण पुर्ण केले.

आजची तरूण पिढी कृषी शिक्षण घेतल्यानंतर फक्त नोकरीच्या शोधात धडपड करत असते. परंतु नामदेव भामरे यांनी नोकरीची आस न धरता कृषी शिक्षणाचा उपयोग शेतीसाठीच व्हावा या विचाराने प्रेरित होऊ शेती करण्यास सुरूवात केली. कृषी शिक्षणाचा उपयोग करून पारंपारीक शेतीचे रूपांतर आधुनिक शेती मध्ये करणे हे ध्येय ठेऊन जीवनाची वाटचाल सुरू केली.

नामदेव भामरे यांचे एकत्रित कुटुंब असून त्यांच्याकडे १३० एकर शेती आहे. त्यांनी कृषीविषयक शिक्षणाचा वापर त्यांच्या स्वतःच्याच शेतीत करण्याचे ठरवून आधुनिक शेतीकडे वाटचाल सुरू केली नामदेव भामरे हे शिक्षणात जेमतेम असले तरी त्यांचे विचार मात्र इतरांपेक्षा वेगळे होते. त्यांच्या मते जी गोष्ट वैयक्तिक रित्या साध्य करता येत नाही ते एकत्र येवून करता येवू शकते या विचाराने प्रेरित होऊन त्यांनी ग्रुप शेती करण्याचे ठरविले त्यासाठी त्यांनी त्यांच्या परिसरातील तसेच नाशिक जिल्हयातील गावोगावी जाऊन शेतक-यांना ग्रुप शेतीचे महत्त्व पटवून दिले या शेतीमुळे अनेक शेतकरी एकत्र येऊन समन्वय साधला जातो, तसेच उत्पादनवाढ बाजारभाव अशा अनेक प्रश्नांवर मात करता येवू शकते. ग्रुप शेतीचे महत्व पटवून देण्यासाठी त्यांनी सोशल मिडीयावर 'भाजीपाला उत्पादक ग्रुप' चालू केला सध्या या ग्रुप मध्ये ४५००-५००० शेतकरी समाविष्ट आहेत. हया ग्रुप मार्फत ते शेतक-यांना सतत मार्गदर्शन करत असतात. तसेच ते ठिकठिकाणी जाऊन शेतक-यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन व शेतीविषयक मार्गदर्शनपर सेमिनार घेऊन शेतक-यांना अनेक पिकांविषयी व हवामानाबद्दल मार्गदर्शन करत असतात.

महाराष्ट्रातील शेतक-यांच्या होत असलेल्या आत्महत्तेचा प्रश्न डोळयासमोर ठेवून त्यांनी त्यांचे हे कार्य नाशिक जिल्हयासाठीच सीमित न ठेवता संपूर्ण महाराष्ट्रातील शेतक-यांना मार्गदर्शन करण्याचे ठरविले व त्यादृष्टीने प्रयत्न करण्यास सुरूवात केली. त्यासाठी त्यांनी ॲग्रोवन या शेतीविषयक वृत्तपत्रात विविध लेख प्रकाशित करून वेळोवेळी महाराष्ट्रातील शेतक-यांना अनेक पिकांविषयी मार्गदर्शन केले व ग्रुप शेतीविषयी प्रोत्साहन दिले राहूरी कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र, नंदुरबार अशा अनेक ठिकाणी जाऊन शेतक-यांना आधुनिक शेतीबद्दल मार्गदर्शन केले.

नामदेव भामरे यांच्याकडे ६० एकर द्राक्षबाग व ३५ एकर डाळींगबाग आहे तसेच त्याव्यातिरिक्त ते मिरची, टोमॅटो, टरबूज अशा अनेक प्रकारच्या भाजीपाल्याची आधुनिक पध्दतीने शेती करतात ते द्राक्ष व डाळींब या फळपिकांची इतर देशात निर्यात सुध्दा करतात.

त्यांच्या या कार्याची दखल घेवून त्यांना ब-याच शेतीविषयक संघटनांनी वेगवेगळया पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. त्यात 'महाराष्ट्र राज्य उत्पादक संघातर्फे' उत्कृष्ट डाळींब व द्राक्ष

पुरस्कार, कृषीथॉन तर्फे उत्कृष्ट डाळींब उत्पादक, कृषीथॉन युवा पुरस्कार तसेच भारतातील नऊ शेतक-यांना मिळालेल्या 'Society for advancement of Research on pomegranate ' या संस्थेतर्फे उत्कृष्ट डाळींब पुरस्कार ही त्यांना मिळालेला आहे. याशिवाय त्यांची ८ दिवसाच्या 'द्राक्ष अभ्यास

दौ-यासाठी' संपूर्ण महाराष्ट्रातील २३ शेतक-यांना केपटाऊन (साऊथ अफ्रिका) येथे जाण्यासाठी निवड करण्यात आली. तेथे त्यांनी द्राक्षाच्या आधुनिक शेतीबद्दल माहिती मिळवली तसेच नामदेव भामरे हे 'यारा फर्टिलाईझर' प्रा.लि कंपनीचे ब्रँड अँबेसिडर आहेत.

नामदेव भामरे यांच्या मते आजच्या तरूण पिढिने नोकरीच्या शोधात न जाता कृषी शिक्षणाचा उपयोग आधुनिक शेती करण्यासाठी व शेतक-यांना सक्षम बनविण्यासाठी करावा व त्याचा फायदा नाशिक जिल्हयातील तसेच महाराष्ट्रातील शेतक-यांना होणारच आहे यात तिळमात्र शंकाच नाही, तसेच त्यांचा कृषी विद्यार्थी ते स्मार्ट शेतकरी हा प्रवास आजच्या तरूण पिढीसाठी एक प्रेरणाच ठरेल, त्यांच्या मते त्याचा हा जो प्रवास आहे तो यशस्वी होण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे के.के.वाघ कृषी महाविद्यालयात घेतलेले कृषी महाविद्यालयीन २००८-१२ या काळात कृषी शिक्षण होय, कृषी शिक्षणाचा अभ्यासक्रम राबवितांना महाविद्यालयाने जे वेगवेगळे उपक्रम राबविले विशेषतः शेतकरी प्रशिक्षण, कृषी चर्चासत्र, शेतकरी मेळावे, कृषी कार्यानुभव यांचा फायदा नक्कीच त्यांच्या जडणघडणीत झाला आहे.





**श्री.किरण भागवत अंत्रे आणि श्री.वैभव विजय पुंड**
**संचालक, ध्रुव ॲग्रो टेक्नॉलॉजीस प्रा.लि. नाशिक**
**मो.नं. ८८३००२६१०६**

श्री.किरण अंत्रे, सोनगाव (ता.राहूरी) व श्री. वैभव पुंड (ता.राहता) या दोन खेडयातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या व के.के.वाघ कृषी महाविद्यालय नाशिक येथून कृषी पदवीचे शिक्षण पुर्ण करून सध्या एका खाजगी कृषीविषयक कंपनीचे संचालक म्हणून काम पाहणा–या या दोन तरूणांची कृषी विद्यार्थी ते कृषी उदयोजक वाटचाल थक्क करणारी आहे.

किरण अंत्रे यांचे शालेय शिक्षण कोल्हार व सोनगाव आणि वैभव पुंड यांनी लोणी व राहता येथे पुर्ण केले, नंतर त्यांनी २००६–२०१० या काळात के.के.वाघ कृषी महाविद्यालय नाशिक येथे कृषी पदवीचे शिक्षण पुर्ण केले एवढयावरच न थांबता दोघांनी त्यांचे पदव्युत्तर शिक्षण मुंबई येथून 'कृषी व्यवसाय व्यवस्थापन' यातून पुर्ण केले तसेच वैभव पुंड यांनी इस्त्राईल या देशात जाऊन 'Advance Agriculture' या विषयात शिक्षण पुर्ण केले.

शेती व शेतक–यांच्या आव्हानांचा विचार करून, शेतीची परिस्थितीची वास्तविकता लक्षात घेऊन, या दोन्ही तरूणांनी या खडतर समस्येची हात करून नोकरीची आस न धरता बदल घडवून आणण्यासाठी कृषी व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला. त्यादृष्टीने जीवनाची वाटचाल सुरू करतांना २०२० पर्यंत १०,००० शेतक–यांच्या उत्पादनात दुप्पट वाढ करण्याच्या ध्येय डोळयासमोर ठेवून २ जून २०११ रोजी ध्रुव ॲग्रो टेक्नॉलॉजिस प्रा.लि. नाशिक या खाजगी कृषी व्यवसाय कंपनीची स्थापना करून आपल्या व्यवसायाला सुरूवात केली. तसेच यानंतर ६ जुलै २०१६ रोजी रेलीगेयर ॲग्रोकेन इंड्रस्टी प्रा.लि. नाशिक या आपल्या दुस–या खाजगी कंपनीची सुरूवात केली.

कंपनी स्थापनेच्या सुरूवातीच्या काळात या दोघांना खुप परिस्थितीला सामोरे जावे लागले, परंतु त्यांनी नंतर या परिस्थितीवर मात करून कृषी उदयोजकतेत सध्या खुप मोठे यश संपादन केले आहे. दोन्ही कंपन्याची सध्याची एकत्रित उलाढाल ही जवळपास ८–९ कोटी रूपये इतकी आहे.

शेतक–यांचा जीवनक्रम बघुन त्यांनी शेतीविषयक माहिती, सेंद्रिय निविष्ठा, रासायनिक निविष्ठा व इतर उत्पादने ही काळाची गरज आहे असे ओळखुन त्यांनी कंपनीच्या माध्यमातुन शेतकरी प्रशिक्षण राबविले व शेतक–यांना वेळोवेळी मार्गदर्शन करत गेले. त्यांनी महाराष्ट्र शासन प्रमाणित सुक्ष्मअन्नद्रव्ये, संजीवके, जैविक खते, जैविक बुरशीनाशके, व इतर जैविक किटकनाशकांची उत्पादन व विक्री करण्याचा व्यवसाय सुरू केला. या सर्व निविष्ठांचा शेतकरी बंधवांना दिवसेंदिवस फायदा होत आहे.

त्यांच्या दोन्ही कंपनीचे उत्पादने महाराष्ट्र राज्यापुरतेच सिमित न ठेवता ते महाराष्ट्रव्यतिरिक्त गुजरात, मध्यप्रदेश, ओरिसा, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, आंध्रप्रदेश इ. राज्यामध्ये कार्यरत आहे.

सध्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची गरज ओळखुन या दोन युवा उदयोजकांनी २०१७–१८ या वर्षात आंतरराष्ट्रीय प्रमाणीकरण व रजिस्ट्रेशन करून घेतले व कंपनीची भारतीय बनावटीची उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतक–यांना उपलब्ध करून दिला तसेच निर्यातीचे धोरण समोर ठेवून अफ्रिका अमेरिका येथे कंपनीच्या उत्पादनांची रजिस्ट्रेशन करून निर्यात सुरू केली आहे.

हा सर्व त्यांचा प्रवास बघुन व त्यांच्या या कामाची दखल घेऊन त्यांना ॲग्रोकेयर कृषीमंच नाशिक या अशासकीय संघटनेने २०१८–१९ चा युवा उदयोजक पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले.

रासायनिक पध्दतीने शेती केल्यामुळे त्याचे होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन त्यांनी सेंद्रिय शेतीचा ध्यास डोळयासमोर ठेवून त्यादृष्टीने कंपनीमार्फत जैविक घटकांचे उत्पादन व विक्री सुरू करण्याचे ठरविले त्यांच्या मते कृषी शिक्षण घेऊन त्याचा उपयोग शेती व शेतक–यांसाठीच व्हावा तेव्हाच महाराष्ट्रातील शेतकरी हा सक्षम होण्यास मदत होईल व शेतीसमोरील आव्हाने कमी होण्यास मदत होईल त्यांच्या मते, त्यांचा कृषी विद्यार्थी ते कृषी उदयोजकता हा प्रवास यशस्वी होण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे के.के.वाघ कृषी महाविद्यालय नाशिक येथे घेतले कृषी शिक्षण होय. २००६–१० या काळात महाविद्यालयाने कृषी अभ्यासक्रम राबवतांना जे वेगवेगळे उपक्रम त्यात शेतकरी प्रशिक्षण, कृषी चर्चासत्र, शेतकरी मेळावा, कृषी कार्यानुभव कार्यक्रम त्यांचा फायदा कृषी उदयोजकतेत मोठया प्रमाणात झाला यांत शंकाच नाही.